| | | |
|---|---|---|
| | **पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


**प्रेस नोट** दिनांक : २७/०७/२०२४

# मालेगाव व सिन्नर शहरांमध्ये मोटर सायकल चोरी करणारे सराईत गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात - चोरीच्या ०७ मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील मोटर सायकल चोरीचे वाढत्या गुन्हयांना प्रतिबंध होण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी नाउघड गुन्हयांचा आढावा घेवून कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथकाने मालेगाव व सिन्नर शहरात मोटर सायकल चोरी करणा-या ०७ आरोपीतांना ताब्यात घेवुन कारवाई केली आहे.

दिनांक २६/०७/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे जिल्हयातील नाउघड मोटर सायकल चोरीचे गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना, गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मालेगाव शहर व सिन्नर तालुक्यातील माळेगाव एम.आय.डी.सी. परिसरात काही संशयीत चोरीच्या मोटर सायकल विक्री करण्याचे उद्देशाने येणार असल्याचे खात्रीशीररित्या समजले.

त्यावरुन पोलीस पथकाने मालेगाव शहरातील जाफरनगर व गुलाबपार्क परिसरातुन खालील संशयीतांना ताब्यात घेवून त्यांचे कब्जातुन **चोरीच्या ४ मोटर सायकल** हस्तगत केल्या आहे.

१) **शहा मोहंमद जैद मो. अस्लम उर्फ जाहिद**, वय २०, रा. गुलाबपार्क, मालेगाव, ता.मालेगाव
२) **तबरेज आलम बदरे उर्फ बद-या**, रा. जाफरनगर, मालेगाव, ता.मालेगाव
३) **आकिब शेख शफिक उर्फ सुरतीया**, वय २५, रा. गुलाबपार्क, मालेगाव, मुळ रा. सुरत, राज्य गुजरात.
४) **मेहबुब अली जाहिद अली**, वय ३७, रा. गुलाबपार्क, मालेगाव, ता.मालेगाव

सदर आरोपींचे कब्जातुन **०२ हिरो पॅशन प्रो, ०२ हिरो सी.डी.डिलक्स** अशा एकुण ०४ मोटर सायकल हस्तगत करण्यात आल्या आहे. यातील आरोपीतांनी कबुली दिल्यावरुन मालेगाव छावणी पोलीस ठाणे कडील गुरनं १६०/२०२४ भादवि कलम ३७९ हा गुन्हा उघडकीस आलेला आहे. सदर आरोपीतांचे इतर साथीदारांचा पोलीस पथक शोध घेत आहे.

तसेच सिन्नर शहरातील माळेगाव एम.आय.डी.सी. परिसरात देखील चोरीच्या मोटर सायकल विक्रीसाठी काही संशयीत येणार असल्याची बातमी मिळालेवरुन स्थागुशाचे पथकाने खालील ०३ सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले.

१) **निखील विजय वाल्हेकर,** वय २०, रा. वेल्हाळे, ता.संगमनेर, जि. अहमदनगर
२) **ज्ञानेश्वर गणपत शेलुते उर्फ आरुष सोनार**, वय २८, रा. छावणी, तोफखाना बाजार, जि.छ.संभाजानगर
३) **संदिप संजय वाल्हेकर,** वय २२, रा. वेल्हाळे, ता.संगमनेर, जि. अहमदनगर

सदर आरोपींचे कब्जातुन **०१ बजाज पल्सर, ०१ हिरो स्पलेंडर, ०१ टिव्हीएस अपाचे** अशा ०३ चोरीच्या मोटर सायकल हस्तगत करण्यात आल्या आहे. सदर आरोपींनी कबुली दिल्यावरुन संगमनेर शहर , एम.आय.डी.सी.अहमदनगर व चंदननगर पुणे शहर पोलीस ठाण्यांकडील मोटर सायकल चोरीचे ०३ गुन्हे तसेच सिन्नर एम.आय.डी.सी. पो.स्टे.कडील गुरनं ३३७/२०२४ भान्यासं. ३०३(२) असे एकुण ०४ गुन्हे उघडकीस आलेले आहे. वरील तिघेही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर यापुर्वी चोरी, जबरी चोरी, घरफोडी यासारखे मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे दाखल आहे. सदर आरोपींचे इतर साथीदारांचा पोलीस कसोशिने शोध घेत असून त्यांचेकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती, यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री. राजु सुर्वे, सपोनि गणेश शिंदे, पोहवा नवनाथ सानप, उदय पाठक, चेतन संवत्सरकर, पोना विनोद टिळे, शरद मोगल, विश्वनाथ काकड, सुभाष चोपडा, योगेश कोळी, दत्ता माळी, देवा गोविंद, नरेंद्र कोळी, तसेच तांत्रिक शाखेचे पोना हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, भाउसाहेब टिळे यांचे पथकाने मोटर सायकल चोरीचे ०९ गुन्हे उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.